केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजना गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राबविण्यात येत असलेल्या "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" यास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२२/प्र.क्र. १४९/योजना-१०

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई-४०० ००१

दिनांक: १७ एप्रिल, २०२३.

वाचा -

१) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०२२/प्र.क्र.१४९/योजना-१०, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२

२) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे पत्र क्र. जा.क्र./राव्यक-ग्रागृ/माशिसं/३१३२३/२०२३, दि. ३१/०३/२०२३

शासन निर्णय-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजना गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सन २०२२-२३ मध्ये संदर्भाधिन दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्यात "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२२-२३ या वर्षामध्ये राज्यात "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अभियान राबविण्यास संदर्भाधीन आदेशान्वये दिनांक ३१.०३.२०२३ पर्यंत मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्रशासकीय कारणास्तव या अभियानास मुदतवाढ देण्यात येत असून सदर अभियान दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधी पर्यंत राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भिय दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयातील अन्य सर्व बाबी जशाच्या तशा लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०४१७१३२७३८७५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Manoj Dattatraya Jadhav

Digitally signed by Manoj Dattatraya Jadhav
DN: cn=Manoj Dattatraya Jadhav, o=Rural Development Department, ou=Central Scheme, email=manoj.jadhav68@nic.in, c=IN
Date: 2023.04.17 18:06:05 +05'30'

(मनोज जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
३. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव व प्रधान सचिव.
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/ विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.
८. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.
९. मा. सर्व पालकमंत्री तथा मंत्री यांचे खाजगी सचिव.
१०. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
११. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, नियोजन/ वित्त/ सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/ गृहनिर्माण विभाग.
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी.

१४. आदिवासी विकास आयुक्त, नाशिक.

१५. समाज कल्याण आयुक्त, पुणे.

१६. कामगार आयुक्त, मुंबई.

१७. सर्व कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

१८. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१९. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय.

२०. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय.

२१. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती.

२२. सर्व सरपंच, ग्रामपंचायत.

२३. निवड नस्ती.